## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २१/७/२०२०

**विषय क्रमांक :– ३१३ त्वर्य**

आरोग्य खात्याकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने एकवट वेतनावर पशुशल्य चिकित्सक अधिकारी, पशु वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता(स्थापत्य), विजतंत्री (इलेक्ट्रीशियन), विद्युत पर्यवक्षेक या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या सेवकांना पुढील ६ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यासाठी, सदर पदावरील सेवांकरीता संबंधित सेवकांकडून नव्याने अनामत रक्कम न घेता पूर्वीचीच अनामत रक्कम ग्राह्य धरणेस व आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करण्यास मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१६९ दि.१५/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३१४ त्वर्य**

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा–येवलेवाडी अंतर्गत आऊट सोर्सिंगने कचरा संदर्भात कामे करुन घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रियांक एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५,०८,७२,९८२=१६ पेक्षा ०.०१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,०८,७८,०६९=४६ पर्यंत दि.१/६/२०२० पासून काम करून घेणेस व कार्यादेश देण्यापुर्वी करण्यात आलेल्या कामास पश्चात मान्यता मिळणेस व मे.प्रियांक एंटरप्रायजेस यांचेशी करारनामा करुन बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. ४/१७१ दि.१६/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३१५ त्वर्य**

हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभागामध्ये टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करणे (सन २०२०–२१) (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार संतोष वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प. र.रु.३९,९९,६००/– पेक्षा ९.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,९९,६७९=९९६ पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१७२ दि.१६/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३१६ त्वर्य**

कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या उरुळी देवाची व शेवाळवाडी येथे दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (२०२०–२१) (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प.र.रु.९९,९६,४२५/– पेक्षा ॲटपार दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.९२,०४,७०८=१४ रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१७३ दि.१६/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३१७ त्वर्य**

धायरी फाटा मुख्य रस्त्यावरील विठ्ठलमंदिर जवळील धायरी फ्लायओव्हर ब्रिजपर्यंत मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर.टी.दाते यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,४९,८७३/– पेक्षा ३५.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,२६,११२=४९ व अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,३९,१३३=५० एकूण र.रु. ३१,६५,२४५=९९ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/१७५ दि.१७/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३१८ त्वर्य**

सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत पडिक हद्दीचे झाडणकाम व स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंगद्वारे करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५,६६,३९,९३४/– पेक्षा ६.४५% जादा दराने)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.६,०२,९३,२०९=७४ पर्यंत दि.१ जून २०२० पासून काम करुन घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/१७८ दि.२०/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३१९ त्वर्य**

एकवट वेतनावर सोशल मिडिया सेल व तांत्रिक कामकाज करण्याकरिता उमेदवारांना २ महिने **मुदतवाढ** देणेसाठी खालील बाबीस मान्यता **देण्याबाबत** मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मावतं/१८० दि.२०/७/२०२० चे पत्र.

१. सोशल मिडिया सेल व तांत्रिक कामकाज करण्याकरिता एकवट वेतन कंत्राटी करार पद्धतीने सेवा घेतलेल्या उमेदवार यांना दि.०७/०४/२०२० ते ०६/०६/२०२० या कालावधीसाठी **पश्चात** मुदतवाढ मिळणेस.
२. सोशल मिडिया सेल व तांत्रिक कामकाज करण्याकरिता एकवट वेतन कंत्राटी करार पद्धतीने सेवा घेतलेल्या उमेदवार यांना एकूण र.रु.३,५०,०००/- आदा करणेस.
३. मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामधील तक्त्यात नमूद केलेल्या उमेदवारांचा २ महिन्यांचा वेतन खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अर्थशिर्षक
**RE11N103**
सन २०२० - २१ चे अंदाजपत्रक

वर खर्ची टाकून वेतन अदा करणेस.

**विषय क्रमांक :– ३२० त्वर्य**

पुणे महानगरपालिकेतील शासन आदेशानुसार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना तुर्तास करोना पार्श्वभुमीवर ६ महिन्यांकरिता किमान वेतन अदा करणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या तकत्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करुन देणेस (सद्यस्थितीत भत्ते, चलनवाढ इत्यादींचा विचारान्वये) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाच्या इंटीग्रेटेड हेल्थ ॲड फॅमिली वेल्फेअर सोसायटी फॉर पीएमसी च्या बँक खात्यावर जमा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१८१ दि.२१/७/२०२० चे पत्र.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– ३२१ त्वर्य**

मा.प्रकाश ढोरे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/७/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेतील जुन्या व नव्या इमारतीमधील पॅसेज, मुख्य सभागृह, स्थायी सभागृह, विशेष सभागृह, मा.महापौर यांचे कार्यालय व जुन्या व नवीन इमारतीचे बाहेरील बाजूचे साफसफाई करणे (निविदा क्र. ७ सन २०१९–२०) कामी निविदा मागविली असता एकूण निविदा धारकांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.लोकराज्य स्वयंम रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देत आहोत.

पुणे शहरात कोविड १९ संसर्गजन्य साथीचा आजाराचा प्रादुर्भाव वाढला असून शहरात स्वच्छतेचे कामकाज करणारे सेवक बाधीत होऊन मनपा मुख्य कार्यालय इमारत सुरु ठेवण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याठिकाणी अत्याधुनिक सोई सुविधाद्वारे साफसफाई व निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून मनपा नविन मुख्य इमारतीचे साफसफाई निविदा आहे. तसेच जुन्या इमारतीमधील पॅसेज व स्वच्छतागृहाची स्वच्छता ह्या निविदेतून केली जाते. सदर निविदेतून जुन्या इमारतीमधील सर्व कार्यालयांची साफसफाई निर्जंतुकीकरण दि.३०/९/२०२१ अखेर पर्यंत करण्यात यावी तसेच या दरम्यान ज्या क्षेत्रिय कार्यालयाकडील कर्मचारी कोविड १९ संसर्गजन्य साथीच्या आजारामुळे बाधीत झाल्यास तर त्या क्षेत्रिय कार्यालयाचे किमान २ दिवस साफसफाई निर्जंतुकीकरण करणे वरील बाबींकरीता सदर निविदेतील दरानुसार ठेकेदार काम करण्यास तयार असल्यास दरमहा निश्चित केलेल्या रकमेनुसार काम करणेस मे.लोकराज्य स्वयंम रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना मान्यता देण्यात यावी.

अर्थशिर्षक सन २०२०–२१
मनपा इमारती सभागृह सावरकर भवन इत्यादी अंतर्गत स्वच्छता करणे
RE19A 111
मान्य तरतुद र.रुपये ९०,००,०००/–

**विषय क्रमांक :– ३२२ त्वर्य**

मा.सौ.नंदा लोणकर व मा.महेंद्र पठारे यांचे दिनांक २१/७/२०२० चे पत्र.

हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, मर्या. विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या व श्री. सद्गुरू शंकर महाराज माहिला उन्नती संस्था, दिप किरण ग्राहक सहकारी संस्था, पुणे या चार संस्था सहकार तत्वावर चालविण्यात येणाऱ्या रजिस्टर्ड संस्था असून या संस्थामधून अनेक गोरगरीब महिला व गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

तरी वरील संस्थेप्रमाणे श्री योगीराज सुशिक्षित बेरोजगार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित संस्थेस शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन क्षेत्रिय कार्यालयास र.रू. ३ लाखापर्यत लागणाऱ्या सेवा व वस्तु घेण्यासाठी काम विना निविदा काढण्यास मान्यता देण्यात यावी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**